माहिती हवीय?

योगिता सरवटे, नाशिक.

□ मेहमूदचा पहिला चित्रपट कोणता? त्याने निर्माण केलेला पहिला चित्रपट कोणता?

– बॉम्बे टॉकीजचा *किस्मत* हा मेहमूदचा पहिला चित्रपट. यात तो बालकलाकार होता. अशोककुमारच्या लहानपणीची भूमिका केली होती. त्याला हास्यअभिनेता म्हणून प्रकाशात आणणारा पहिला चित्रपट १९५८चा *परवरीश*. त्याआधी *नादान*, *नोकरी*, *सी.आय.डी.*, *प्यासा*, *फरार*, *बारीश*, *हावडा ब्रीज* या चित्रपटातून त्याने छोट्या मोठ्या भूमिका केल्या. त्याने निर्माण केलेला पहिला चित्रपट १९६१चा *छोटे नवाब*.

सूर्यकांत घोलप, भांडूप.

□ लक्ष्मीकांत बेर्डे व अशोक सराफ यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *धूमधडाका, गडबड घोटाळा, तुझ्यावाचून करमेना, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, अशी ही बनवाबनवी, चंगू मंगू, मामला पोरींचा, एक गाडी बाकी अनाडी, फेकाफेकी, बाळाचे बाप ब्रह्मचारी, अफलातून, एकापेक्षा एक, गोडी गुलाबी, थांब थांब जाऊ नको लांब, धमाल बावळ्या गणप्याची, शेजारी शेजारी, आयत्या घरात घरोबा, धरलं तर चावतंय, मुंबई ते मॉरिशस, ठण ठण गोपाळा, शुभमंगल सावधान, तू सुखकर्ता, माझा छकुला, जमलं हो जमलं, टोपी वर टोपी, धमाल जोडी, सुना येती घरा* या चित्रपटात लक्ष्मीकांत बेर्डे आणि अशोक सराफ एकत्र दिसले.

मीनल कीर्तिकर, मुंबई.

□ वैजयंती मालाचा पहिला आणि शेवटचा चित्रपट कोणता?

– वैजयंती मालाचा पहिला चित्रपट *बहार* आणि शेवटचा चित्रपट *गंवार*.

राधा सरदेसाई, पुणे.

□ उत्तरा केळकर यांचा पार्श्वगायन केलेला पहिला चित्रपट कोणता?

– *सुशीला* हा उत्तरा केळकर यांचा पार्श्वगायन केलेला पहिला चित्रपट.

राजेश पिसाट, उस्मानाबाद.

□ जगातील पहिला मूकपट?

– एडिसनने निर्माण केलेला *द लाईफ ऑफ ॲन अमेरिकन फायरमन*.

स्वाती कातकर, बोरिवली.

□ उमा भेंडे यांचे हिंदी चित्रपट कोणते?


– दोस्ती, खिलाडी.

अनिकेत साळवी, डोबिंवली.

□ पटकथा व संकलन म्हणजे काय?

नयनतारा पाटील, दादर.

□ मनोजकुमारने भारत हे नाव कोणकोणत्या चित्रपटात घेतले?



उपकार चित्रपटात मनोजकुमार

– *उपकार, पूरब और पश्चिम, शोर, रोटी कपडा और मकान, क्रांती, कलयुग और रामायण, क्लर्क*.

– कोणत्याही कथेवरून चित्रपट तयार करताना चित्रपटाच्या दृष्टीने त्या कथेची दृश्यवार रचना करावी लागते. ती दृश्यवार रचनेची प्रक्रिया म्हणजे पटकथा. चित्रीकरणाच्या वेळी एकच दृश्य अनेकदा चित्रित केले जाते. त्यातून चांगल्या दृश्याची अचूक निवड करून चित्रपट जोडणे म्हणजे संकलन. यात चित्रपटाची लांबी वाढत असेल तर अनावश्यक दृश्यांना कात्री लावण्याचे कामही संकलक करतो.

वैजयंती शिर्सेकर, विक्रोळी.

□ रेल्वेवर चित्रित झालेले पहिले गाणे कोणते?

– १९४२च्या *जवाब* या चित्रपटातील 'ये दुनिया तुफान मेल...' हे रेल्वेवर चित्रित झालेले पहिले गाणे होते.

महेश धनावडे, रत्नागिरी.

□ बिमल रॉयचा शेवटचा चित्रपट कोणता?

– *बंदिनी* हा बिमल रॉयचा शेवटचा चित्रपट.

राजेंद्र बैकर, ठाकुर्ली.

□ रेखा-अमिताभ या जोडीचा पहिला चित्रपट कोणता? त्याचे दिग्दर्शक-संगीतकार कोण?

– रेखा-अमिताभ या जोडीचा *दो अंजाने* पहिला व *सिलसिला* हा दुसरा चित्रपट. *दो अंजाने*चे दिग्दर्शक दुलाल गुहा व संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल. *सिलसिला*चे दिग्दर्शक यश चोप्रा व संगीतकार शिवहरी.

सुषमा भोसले, अमरावती.

□ कोणकोणत्या संगीतकारांना आतापर्यंत फाळके पुरस्कार मिळालाय?

– पंकज मलिक, रायचंद बोराल, नौशाद, भूपेन हजारिका या संगीतकारांना आतापर्यंत फाळके पुरस्कार मिळालाय.

रामचंद्र मावळे, मुलुंड.

□ धर्मेंद्रने कोणकोणत्या चित्रपटात खलनायकाची भूमिका केलीय?

– *आयी मीलन की बेला* या चित्रपटात धर्मेंद्रने खलनायकाची भूमिका केलीय.

संगीता दहितुले, तळेगाव.

□ कोणत्या अभिनेत्रीच्या छायाचित्राने सर्वात प्रथम कॅलेंडर निघाले?

– दुर्गा खोटे. बाबूराव पेंटर यांच्या *प्रतिभा* या चित्रपटात त्यांनी दिलेली एक पोज कॅलेंडर बनून गेली.

राजेश ठाणेकर, उमरगाव.

□ बलराज साहनीनी नरगीसबरोबर *लाजवंती*त सर्वात प्रथम भूमिका केली की *घरसंसार* या चित्रपटात?

– १९५१च्या *हलचल*मध्ये बलराज साहनीनी नरगीसच्या पतीची भूमिका केली होती. ही भूमिका नरगीसबरोबरची त्यांची पहिली भूमिका.

संस्कृती सावंत, कणकवली.

□ *शहाजहान* या चित्रपटात रुहीची भूमिका करणारी अभिनेत्री कोण?

– *शहाजहान* या चित्रपटात रुहीची भूमिका करणारी अभिनेत्री सलमा आगाची आई नासरीन.

अनिकेत जोशी, बेलापूर.

□ *प्रीत तुझी माझी*मध्ये नायिका कोण होती?

– राधा बारटक्के.